# प्रेस नोट दि. 12/06/2018

## ऑनलाईन फसवणूकीद्वारे परदेशी बँकेत गेलेली रक्कम परत मिळविण्यात सायबर क्राईम सेल पुणे यांचे यश

हिंजवडी पुणे येथील नामांकित कंपनीची ईमेलआयडीच्या माध्यमातून Man In Middle Attack - Hacking या सायबर गुन्हे प्रकारामुळे रू. 2 कोटी 90 लाख रूपयांच्या झालेल्या आर्थिक फसवणूकीबाबतचा तक्रारअर्ज दिनांक 26/05/2018 रोजी सायबर क्राईम सेल, पुणे शहर यांना प्राप्त झाला आहे.

सदर प्रकरणी फसवणूक झालेल्या कंपनीतील फायनान्स व परचेस विभागातील काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून माहिती मिळविण्यात आली. सदरची कंपनी जगातील सर्व ठिकाणी दोन व चारचाकी अशा सर्व गाडयाचे हेड लाईट बनविण्याचे काम करते. त्यासाठी लागणारा कच्चा माल ते इतर देशातील सप्लायर्सकडून मागवितात.

दि-27/04/2018 रोजी या कंपनीने मशिन खरेदीसाठीची ऑर्डर चीन देशातील मशिनरी बनविणाऱ्या कंपनीस ईमेल आयडीव्दारे पाठविण्यात आली होती. त्यानुसार अॅडव्हान्स रक्कम आधी देण्याचे ठरले व उर्वरित रक्कम मशिन डिलीव्हरी झाल्यानंतर देण्याचे ठरले होते. तथापि कोणीतरी अज्ञाताने चीनमधील कंपनीच्या ईमेलआयडीसारखा दिसणारा बनावट ईमेल आयडी तयार करून तक्रारदार कंपनीस बनावट ईमेलद्वारे संपर्क केला व परचेस इनव्हाईसवरील बँक खात्यात बदल झाल्याचे सांगून खरेदीची अॅडव्हान्स रक्कम चीन देशातील अन्य बँक खात्यावर भरणा करावयाच्या सुचना दिल्या. तक्रारदार कंपनीने बँक खात्याच्या बदलाबाबत कोणतीही खात्री न सदरची रक्कम स्वीफ्ट ट्रान्सफर केली.

कंपनीने पाठविलेल्या पैशाची खातरजमा करण्यासाठी तक्रारदार कंपनीने चीनमधील कंपनीस ईमेल केला असता त्यांचे बँक खात्यात रक्कम जमा झाली नसल्याचे सांगितले, त्यावरून कंपनीची फसवणूक झाल्याचे लक्षात आले. तक्रारदार कंपनीने तात्काळ सायबर क्राईम सेल येथे तक्रार नोंदविली.

तक्रारदार यांच्याकडून बॅक डिटेल्स घेवून चीनमधील बनावट ईमेल धारकाच्या बँक खात्याची माहिती मिळविण्यात आली. चीन देशातील स्थानिक पोलीसांशी सायबर क्राईम सेलने संपर्क केला व त्यांच्या सहकार्याने बँकेस पत्रव्यवहार करून फसवणूक झालेली रक्कम मुळ खात्यात तात्काळ परत मिळविण्यास सायबर क्राईम शाखेस यश आले आहे. सदरची कामगिरी श्री.सुधीर हिरेमठ पोलीस उप-आयुक्त, आर्थिक व सायबर, पुणे शहर यांच्या मार्गदर्शनाखाली सायबर क्राईम सेलकडील पोनि जयराम पायगुडे, पोनि मनिषा झेंडे, सपोनि सचिन गवते, मपोशि शितल वानखेडे यांनी केली आहे.

**मॅन ईन मिडल अटॅक (हॅकींग)** - या सायबर गुन्हेगारी प्रकारामध्ये दोन वेगवेगळया देशातील कंपन्यांमधील खरेदी/विक्री, आयात/निर्यात व्यवहारांबाबतचे ईमेल संभाषण हॅक केले जाते व रक्कम देणाऱ्या कंपनीस बनावट ईमेल आयडी पाठवून जणू मुळ कंपनीच ईमेल संभाषण करत आहे असे भासविले जाते, त्यामुळे खरेदीदार कंपनी बँक खात्यात रक्कम ट्रान्सफर करण्यापुर्वी कोणतीही खात्री करत नाही व आर्थिक फसवणूक होते. फसवणूक झालेली रक्कम गुन्हेगार तात्काळ काढून घेतात, झालेली फसवणूक लक्षात येण्यास उशिर होतो त्यामुळे सदरची रक्कम परत मिळविणे अशक्य होते. अशा प्रकारची आर्थिक्र फसवणूक रोखण्यासाठी आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्यांनी त्यांच्याकडील संगणक यंत्रणा, ईमेल सुविधा सुरक्षेबाबत पुढीलप्रमाणे काळजी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

- आंतरराष्ट्रीय व्यवहार अगर आयात निर्यात करताना परदेशी कंपनीबाबत खात्री करून अगर प्रत्यक्षात भेट देवूनच व्यवहार करावेत.
- परदेशी कंपनीचे ईमेल आयडीबाबत खात्री करावी व त्यादृष्टीने ईमेल फिल्टरींग सुविधा वापरावी, शक्यतो फायरवॉल सॉफ्टवेअर्सचा वापर करावा.
- फ्री ईमेल सर्व्हीसेसचा वापर शक्यतो करू नये. ईमेल सर्व्हीस देणाऱ्या (वेब सर्व्हिस प्रोव्हाडर्स) कंपनीकडून संगणक यंत्रणेचे सिक्युरिटी ऑडीट करून घ्यावे.
- ईमेल्सची हाताळणी शक्यतो एकाच व्यक्तीकडून केली जावी. आर्थिक व्यवहार करण्यापुर्वी परदेशातील कंपनीकडून फोनदवारे अगर अन्यप्रकारे खात्री करून घ्यावी व मगच व्यवहार करावेत.
- कंपनीचा ईमेल आयडी, इंटरनेट कनेक्शन अन्य कोणी हाताळत नाही याबाबत वेळोवेळी खात्री केली जावी व वेळोवेळी पासवर्डस बदलण्यात यावेत.
- इंटरनेट सिक्युरिटी पुरविणाऱ्या अँटी व्हायरस सॉफ्टवेअर्सचा वापर करण्यात यावा.

अशा प्रकारची फसवणूक झाल्यास तात्काळ सायबर क्राईम सेल, गुन्हे शाखा, पुणे शहर येथे फोन क्र. 020-26123346 ईमेल आयडी crimecyber.pune@nic.in वर संपर्क करावा.